लोकमत

# 'जेडीआयईटी'च्या विद्यार्थ्याची दहा लाखांच्या वार्षिक पॅकेजवर नामांकित कंपनीत निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी शंकर पवार याची 'बायजूज' या नामांकित कंपनीत दहा लाख रुपये वार्षिक पॅकेजवर निवड झाली आहे. तो इलेक्ट्रीकल इंजिनिअरिग शाखेचा विद्यार्थी आहे.



शंकर पवार

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण देश लॉकडाऊन आहे. जेडीआयईटीच्या यशस्वी प्रयत्नातून 'बायजूज' या नामांकित कंपनीद्वारे ऑनलाईन आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले होते. यात सर्वप्रथम विद्यार्थ्यांची ॲप्टीट्यूड टेस्ट घेण्यात आली. स्ट्रेट टेस्ट, टेक्निकल टेस्ट, सेल्स डेमो व काही कार्य (टास्क) देण्यात आले. या टेस्टद्वारे शॉर्टलिस्ट करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे पर्सनल इंटरव्ह्यू घेण्यात आले. यातून अंतिम वर्ष इलेक्ट्रीकल इंजिनिअरिग शाखेतील शंकर पवार याची अंतिम निवड झाली. त्याला बिझनेस डेव्हलपमेंट ट्रेनी या पदावर रुजू करुन घेतले जाणार आहे. कंपनीतर्फे एचआर मॅनेजर करिश्मा बीडला यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूचे कामकाज पाहिले.

## 'बायजूज'चे देशभरात जाळे

'बायजूज' या कंपनीकडे भारतातील सर्वाधिक अग्रगण्य असे के-१२ असे लर्निंग ॲप्स आहे. यामुळे अधिक प्रभारी शिक्षण पद्धतीचा अवलंब करता येतो. ही शिक्षण प्रणाली जेईई, एनईईटी, सीएटी, आयएएस, जीआरई या स्पर्धा परीक्षेसाठी प्रभावी आहे. जीमॅटसुद्धा आकर्षक व प्रभावी ठरते. सद्यस्थितीत 'बायजूज'मध्ये तीन लाख ३० हजार विद्यार्थी या ॲपद्वारे प्रशिक्षण घेत आहेत. कंपनीने भारतातील एक हजार ७०० पेक्षा अधिक शहरात आपले जाळे पसरविले आहे.